# बी.ए. (इतिहास)

## द्वितीय वर्ष : सत्र ४

## गृहपाठ : २०१६-१७

### प्राचीन भारताचा इतिहास (मौर्यकाळ ते इ.स.१२००) (HC-401)

**(सत्र ४ : अभ्यासासाठी प्रकरणे : प्रकरण क्र. *६ ते १०*)**

**टीप : नमुना उत्तरात दिलेली प्रस्तावना व समारोप हे उदाहरणादाखल आहेत. त्या व्यतिरिक्त प्रश्नाशी सुसंगत अशी प्रस्तावना व समारोप स्वतंत्रपणे लिहिल्यास त्याचे स्वागतच आहे.**

**१. चंद्रगुप्त मौर्याच्या साम्राज्यविस्ताराचे वर्णन करून त्याच्या कारकिर्दीचे मूल्यमापन करा.** **गुण : १५**

**प्रस्तावना** – चंद्रगुप्त कोण होता ते लिहावे.

**चंद्रगुप्त मौर्य** – साम्राज्यविस्तार, योग्यता – प्रचंड साम्राज्याचा निर्माता, महान क्रांतिकारक, समर्थ नेतृत्व, कल्याणकारी प्रशासक, महान त्यागी

**समारोप** – मौर्यांचे साम्राज्य हे भारतातील पहिले मोठे साम्राज्य. त्याची पायाभरणी चंद्रगुप्ताने केली. तसेच परकियांच्या आक्रमणाला समर्थपणे तोंड दिले.

**२. समुद्रगुप्ताच्या कर्तृत्वाचे वर्णन करा.** **गुण : १५**

**प्रस्तावना** – समुद्रगुप्त कोण होता ते लिहावे.

**समुद्रगुप्ताचे कर्तृत्व** – साम्राज्यविस्तार, मांडलिकत्वाच्या पध्दतीचा अवलंब विविध सत्तांशी मैत्री करार, अश्वमेध यज्ञ, नाणी, योग्यता

**समारोप** – भारतातील सरंजामशाहीचा उद्गाता म्हणून समुद्रगुप्ताचे महत्त्व ४ ते ५ वाक्यात लिहावे.

**३. थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतीही दोन)** **गुण : १५**

**अ) मौर्य साम्राज्याच्या विनाशाची कारणे लिहा.**

**प्रस्तावना** : मौर्य साम्राज्य का व कसे संपले हे २ ते ३ वाक्यात लिहावे.

**मौर्य साम्राज्याच्या विनाशाची कारणे** : दुबळे राज्यकर्ते, मौर्य साम्राज्याचे विभाजन, खालावलेली आर्थिक स्थिती, सम्राट अशोकाचे धोरण, ब्राह्मणांचा प्रतिकार, एककेंद्री राज्यकारभार, ग्रीकांचे आक्रमण, जुलमी राज्यकारभार

**समारोप** : मौर्य साम्राज्याच्या ऱ्हासानंतर उदयाला आलेली राजघराणी याबाबत २ ते ३ ओळीत लिहावे.

**आ) गुप्त घराण्याचा ऱ्हास का झाला?**

**प्रस्तावना** : गुप्त घराण्याचा ऱ्हास कधी झाला ते लिहावे.

**गुप्त घराण्याचा ऱ्हास** : अकर्तबगार व दुबळे राजे, बौध्द धर्माचा स्वीकार, वारसा संघर्ष, दुर्बल केंद्रसत्ता, वंशपरंपरागत अधिकारपदे, प्रांताधिकाऱ्यांची बंडखोरी, मांडलिक राजांची आक्रमकता, परकीयांची आक्रमणे, संपर्क व दळणवळणातील अडचणी, आर्थिक दौर्बल्य

**समारोप** : मौर्य साम्राज्याच्या ऱ्हासानंतर उदयाला आलेली राजघराणी याबाबत २ ते ३ ओळीत लिहावे.

**इ) कुशाणांविषयी माहिती लिहा.**

**प्रस्तावना** – कुशाणांनी भारतात कुठे साम्राज्य स्थापन केले?

**कुशाण** – मूळ स्थान, सम्राट कनिष्क, व्यापाराची भरभराट, बौध्द धर्माचा प्रसार

**समारोप** – एकूणच परकीयांचा भारतीय संस्कृतीतील सहभाग महत्त्वाचा

**ई) पाल, प्रतिहार आणि राष्ट्रकूट यांची माहिती देऊन त्यांच्यातील संघर्षाची माहिती द्या.**

**प्रस्तावना** – या सत्तांचा कालखंड

**तिन्ही सत्तांची थोडक्यात माहिती** (स्थान, महत्त्वाचे राजे, योगदान) संघर्षाची कारणे –राजकीय पोकळी व आर्थिक सामर्थ्य प्राप्त करणे, शेवटी विजय प्रतिहारांचा

**समारोप** – संघर्ष असूनही इतिहासामध्ये या सत्तांचे महत्त्वपूर्ण योगदान

**४. टिपा लिहा.** (कोणत्याही दोन) **गुण : १५**

**अ) संगम कालखंडातील वाङ्मय**

**प्रस्तावना** : संगम कालखंड म्हणजे काय ते २ ते ३ वाक्यात लिहावे.

**संगम कालखंडातील वाङ्मय** : ३ सभा, मोठ्या संख्येने वाङ्मय निर्मिती, कवयित्रींचा सहभाग, स्वतंत्र द्रविडी अस्मितेचे जतन, विषय वैविध्य, पांड्य राज्यकर्त्यांचा आश्रय

**समारोप** : सदर वाङ्मयाचे महत्त्व २ ते ३ वाक्यात लिहावे.

**आ) प्राचीन भारतातील सामंतशाही**

**प्रस्तावना** : सामंतशाही म्हणजे काय ते २ ते ३ वाक्यात लिहावे.

**भारतातील सामंतशाही :** मांडलिकत्वाची व्यवस्था, धार्मिक व सामाजिक क्षेत्रातील सामंतशाही

**समारोप** : मध्ययुगातील सामंतशाही कशी होती याबद्दल २ ते ३ वाक्ये लिहावीत.

**इ) राष्ट्रकुटांचे योगदान**

**प्रस्तावना** – राष्ट्रकुटांच्या सत्तेचा परिचय

**राष्ट्रकूट** – ज्ञान,विज्ञान, शिक्षण, साहित्य यांना उत्तेजन, वास्तुकला व शिल्पकला यांचा प्रसार – लेणी

**समारोप** – आजही लेण्यांच्या रूपाने राष्ट्रकुटांच्या योगदानाची साक्ष

**ई) विस्तीर्ण भारत**

**प्रस्तावना** – संकल्पनेचा अर्थ – भारतीय संस्कृतीच्या प्रसार जगभरात झाल्याने भारताची व्याप्ती वाढली. ही व्याप्ती म्हणजेच

**विस्तीर्ण भारत** – व्यापार व राजकीय विस्तार यामुळे परदेशांशी संबंध, संबंधित देश राजसत्ता, धम, स्थापत्य, साहित्य, ज्ञान विज्ञान यांचे संक्रमण

**समारोप** – भारताची ही सांस्कृतिक व्याप्ती भारताच्या राजकीय सामर्थ्याची व सांस्कृतिक संपन्नतेची साक्ष देते.


**५. विद्यार्थीमित्रांनो, या प्रश्नामधील उपप्रश्नांची उत्तरे तुम्हाला पुस्तकात तयार मिळणार नाहीत. क्रेडिट सिस्टिममध्ये यु.जी.सी.च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार विद्यार्थ्यांनी त्यांची निरीक्षणशक्ती, आकलनक्षमता व विचारशक्ती यांचा वापर करून काही काम करणे अपेक्षित आहे. खालील प्रश्न तुम्हाला मनोरंजक व ख-या अर्थाने विचार व अभ्यास करायला प्रेरणा देणारे असतील. एकूण गुण २०**

**५ अ) पर्यायी प्रश्न** गुण १६

खालील छायाचित्र (फोटो) महाराष्ट्रातील सुप्रसिध्द अजंठा लेण्यांचा आहे. खाली दिलेले या लेण्यांशी संबंधित प्रश्न सोडवा. (उत्तरे लिहिण्यासाठी तुम्ही इंटरनेटचाही वापर करू शकता.)



१. लेणी हे इतिहासाची कोणत्या प्रकारची संदर्भ साधन आहे?
२. अजंठा लेण्यांचा संबंध कोणत्या धर्माशी आहे?
३. ही लेणी काय हेतूने तयार करण्यात आली?
४. कोणत्या घराण्याच्या काळात ही लेणी कोरली गेली?
५. सोबत दिलेला महाराष्ट्राचा नकाशा काढा आणि त्यात अजंठाचे स्थान दाखवा.
६. ही लेणी कोणत्या जिल्ह्यामध्ये आहेत?
७. महाराष्ट्रातील इतर काही लेण्यांची नावे लिहा.




**आ) खालील राजांची यादी कालानुक्रमानुसार लिहा.** गुण ४

प्रस्तुत प्रश्नामध्ये दिलेल्या राजांचा क्रम त्यांच्या कालखंडानुसार लावा. उदा. :

| **प्रश्नातील क्रम** | **कालानुक्रम** |
|---|---|
| १. शाहू | २. शिवाजी |
| २. शिवाजी | ३. संभाजी |
| ३. संभाजी | ४. राजाराम |
| ४. राजाराम | १. शाहू |

वर उदाहरणात दिल्याप्रमाणे खालील राजांचा योग्य क्रम लावा.

१. हर्षवर्धन
२. चंद्रगुप्त मार्य
३. समुद्रगुप्त
४. अशोक